**जगभर**

# सीरिया : तीन कावेबाज आणि एक लाख बळी

**चंद्रशेखर पुरंदरे**

गेल्या दीड वर्षांत 'जगभर'मध्ये सीरियाचा सतत आढावा घेतला आहे. (मार्च २०१२, नोव्हेंबर २०१२, मार्च २०१३). त्यावरून सीरियन संघर्षाची पार्श्वभूमी व 'प्रगती' माहीत असावी.

तरीही, थोडक्यात, २०११ च्या अरब वसंतात सीरियातही जनआंदोलने सुरू झाली. सीरियावर गेली ४३ वर्षे असद पिता-पुत्रांची हुकूमशाही आहे. आधी हाफेझ असद व आता बशर असद. निषेध प्रथम वैध व शांततापूर्ण होते. पण कोणताही हुकूमशहा भयगंडाने पछाडलेला असतो, तीच गोष्ट असदची.

असद घराणे शिया या मुस्लिमांच्या एका पंथातील उपपंथीय. मध्यपूर्वेतील आणखी एकमेव शिया राजवट म्हणजे इराण. म्हणून इराणचा असदलाही सशस्त्र व सक्रिय पाठिंबा आहे.

इराणच्या कट्टर विरोधातील मध्यपूर्वेतील इतर हुकूमशाही राजवटी सुन्नी आहेत. तेलाच्या व्यापारावर संपन्न झालेल्या व अमेरिकेच्या संरक्षणाखाली असलेल्या सौदी अरेबिया, कतार वगैरे देशांना इतर देशातील सुन्नींचे रक्षण ही आपली जबाबदारी वाटते.

त्यात सीरियात शिया अल्पसंख्य असले तरी सत्ताकेंद्रे त्यांच्या ताब्यात आहेत. त्यामुळे बहुसंख्य सुन्नी नाराज असतात. त्यांना वरील सुन्नी देशांचा पाठिंबा आहे. मग राजवटीविरुद्धच्या न्याय्य मागण्या एवढे सौम्य स्वरूप असणाऱ्या जनआंदोलनांना हां हां म्हणता हिंसक व सांप्रदायिक वळण लागले. पिढ्यान्‌पिढ्या सलोख्याने वागणारे समूह एका रात्रीत एकमेकांच्या जिवावर कसे उठतात ते स्वातंत्र्यापासून मुझफ्फरनगरपर्यंत आपण पाहतोच. त्यात विरोध हिंसेने चिरडून टाकायचा ही असद घराण्याची परंपरा आहे. १९८२ साली हमा शहरातील बंड हाफेझ असद याने असेच चिरडले होते. तेथे तीन आठवड्यात २० ते ४० हजार लोकांची कत्तल करण्यात आली होती. फेब्रुवारी २०१२ पासून बशरने हेच केले. परिणामी त्याच्या विरुद्ध सशस्त्र उठाव सुरू झाले. चोरून आणलेल्या, सरकारी सैन्याकडून पळवलेल्या शस्त्रांनी विरोधी, सशस्त्र फळी उभी राहिली. म्हणजे सरळ यादवीच सुरू झाली. एकीकडे सरकारी सैन्य, इराणची शस्त्रे व मार्गदर्शन आणि अलिकडे हिजबुल्लाचे धर्मवीर विरुद्ध असंघटित सशस्त्र विरोध-त्याला थोडाफार पाठिंबा व मदत तुर्कस्तान, कतार यांचा. आता परिस्थिती अशी आहे की देशाचा ६०% भूभाग आणि ३० ते ४०% लोकसंख्या असदच्या आधिपत्याखाली आहेत. बाकीचे विविध विरोधी गटांच्या अखत्यारीत तरी आहे किंवा तेथे अराजक तरी आहे. म्हणजे देशाची फाळणी झालेलीच आहे.

त्यात भर म्हणून या यादवीचा फायदा घेण्यासाठी व सीरियात बस्तान बसवण्यासाठी अल कईदा या मुस्लिम मूलतत्त्ववादी संघटनेचे धर्मवेडे सैनिकही जगभरातून तेथे रवाना झाले आहेत. तेही असदची राजवट उलथण्यास उत्सुक आहेत. त्यांना बृहत्‌खिलाफतीचा सीरिया हा एक भाग करायचा आहे! त्यांचा विरोधी सहभाग वस्तुत: असदच्या पथ्यावर आहे. माझी आधुनिक व निधर्मी राजवट पाडण्यासाठी 'बाहेरचे' मूलतत्त्ववादी प्रयत्न करत आहेत, हा त्याचा पहिल्यापासून दावा आहे. ही आगंतुक मंडळी सगळ्या जगालाच डोकेदुखी आहे. लिबियामधील गडाफीच्या पाडावानंतर तेथे उपद्रवाचे काम राहिले नाही मग या टोळ्या मालीमध्ये गेल्या आणि तेथे रक्तरंजन सुरू झाले. आज अमेरिका, ब्रिटन, रशियापासून भारतापर्यंतच्या देशातून हे स्वयंसैनिक सीरियात आहेत. असदचा पाडाव झाला किंवा नाही तरी त्यांचे तेथले काम संपले आणि ते मायदेशी आले की आपल्या देशी हाच आसुरी नाच सुरू करणार. पण तो मुद्दा निराळा.

आता देशाबाहेरच्या शक्तींची भूमिका पाहू. हे हत्याकांड थांबले पाहिजे याबाबत सगळ्यांचेच एकमत आहे. ते कसे हा वादाचा मुद्दा. असद जाणे हे पश्चिमेच्या मते हत्याकांड थांबवण्याचे एकमेव उत्तर आहे. वस्तुत: असद गेल्याने २०१० पर्यंतचा एकसंध सीरिया काही परत तसा होणार नाही. शिया-सुन्नी संघर्ष आजच्या इराकसारखाच चालू राहणार आणि असदची शस्त्रे कोण पळवतो त्यावर नवीन अस्थैर्य व हिंसा ठरणार. अगदी असद जाणे हे उत्तर आहे असे म्हटले तरी मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार? असदविरोधकांना सुरूवातीच्याच काळात सशस्त्र मदत केली असती तर कदाचित त्यांचे पारडे झुकते झाले असते. तुर्कस्थान, कतार व NATO चे सभासद (म्हणजे पश्चिम) यांनी ते टाळले. दुसरा पर्याय होता सीरियाचे काही भाग No Fly Zone म्हणून जारी करणे. म्हणजे त्या आकाशात लढाऊ विमानांना बंदी असणे. अशी बंदी पहिल्या इराकयुद्धापासून उत्तरेच्या कुर्दवंशीयांच्या प्रांतावर व दक्षिणेतील शिया प्रांतावर पश्चिमेने घातली होती. त्यामुळे त्या कुर्दांचे शिरकाण करण्याचा सद्दाम हुसेनचा प्रयत्न फसला आणि मोठा नरसंहारही टळला. आज तो प्रांत स्वायत्त आहे. अशी बंदी वर्षापूर्वीच घातली असती तर स्वत:च्या जनतेवरचे असदचे हवाई हल्ले तरी थांबले असते. या निष्क्रियतेने मागच्या

फेब्रुवारीपर्यंत ५ ते ८ हजार बळी पडले होते. ते आता लाखावर गेले आहेत. ५५ लाख लोक - सीरियाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ एक चतुर्थांश-देशांतर्गत किंवा देशाबाहेर निर्वासित झाले आहेत. मारलेले बहुतांशी असदनेच मारले. बंडखोरांनी हत्या केलेल्या त्याच्या सैनिकांची संख्या लाखापर्यंत जाऊच शकत नाही.

ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात या यादवीत प्रथमच रासायनिक अस्त्रे (विषारी वायू) वापरली गेली. त्यात हजार-दीड हजार लोक मरण पावले. त्यात स्त्रिया, मुले, वृद्ध हेही होते. मग अचानक पश्चिमेला जाग आली. संयुक्त राष्ट्रसंघानेही या प्रांतातील नमुने गोळा करण्यास पथक पाठवले. एवढे बळी तर दर आठवड्याला गेली दोन वर्षे पडतच आहेत. पण असदला हुसकावून लावण्यासाठी लष्करी कारवाई करायला आता जनमत अनुकूल होईल या होऱ्याने लष्करी कारवाईची 'आवश्यकता' अमेरिकेची सरकारी प्रचारयंत्रणा पटवून देऊ लागली. पहिल्या जागतिक युद्धानंतर १९२५ सालापासून युद्धात रासायनिक अस्त्रे वापरण्यास आंतरराष्ट्रीय बंदी आहे. त्यावर सीरियाने आजवर सही केलेली नाही. अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन हे या हस्तक्षेपाला बऱ्यापैकी अनुत्सुक. त्यातही व्यक्तिश: ओबामा उत्सुक नसावा असे चित्र दिसले. मग प्रथम ब्रिटिश पंतप्रधानाने अशी कारवाई करावी का यावर लोकसभेत कौल घेतला. त्यात तो ठराव फेटाळला गेल्याने ब्रिटिश सरकारचे हात बांधले गेले. मग फ्रान्स पुढे सरसावला. दरम्यान ओबामानेही त्यांच्या राज्यसभेत व लोकसभेत कारवाईसाठी ठराव मांडला. त्यावर मतदान सप्टेंबर अखेरपर्यंत व्हावे पण निर्णय अनिश्चित आहे. त्याचे कारण म्हणजे अमेरिकेत जनमत या हस्तक्षेपाविरुद्ध आहे; आणि खासदारांना त्याची जाणीव आहे. अफगाणिस्तान, इराक युद्धाची फलनिष्पत्ती ऋण आहे, याची जाणीव आता कोठे अमेरिकन जनमानसात पोचली आहे. 'आम्ही जगाचे तारणहार' या उर्मटपणाने अमेरिकेने ही दोन्ही युद्धे जगावर लादली. त्या दोन्ही देशांत हिंसक अराजक आहे. दोन्हीत मिळून कित्येक लाख निरपराध नागरिक मृत्युमुखी पडले त्याची अमेरिकन जनतेला काहीच पर्वा नाही पण अब्जावधी डॉलर्सचा खर्च आणि काही हजार अमेरिकनांचे भंपक आदर्शवादासाठीचे 'हौतात्म्य' मात्र त्यांना कळते. त्यात सध्याच्या आर्थिक मंदीमुळे दर काही वर्षांनी जगावर नवीन युद्ध लादण्याच्या अमेरिकेच्या जन्मजात खोडीला जरा चाप लागला आहे.

इराक युद्ध खोट्या दाव्यावर केले गेले. (सद्दामकडे अण्वस्त्र आहेत.) तोच खोटारडेपणा रासायनिक शस्त्रांबाबत सीरियन राजवटींविरुद्ध केला जात आहे असा रशियाचा स्पष्ट आरोप आहे. ९ सप्टेंबरला ओबामाने देशाला उद्देशून भाषण केले. ते याबाबतचा अमेरिकेचा संभ्रम दाखवणारे होते. जॉर्ज बुशचा राणा भीमदेवी थाट नव्हता किंवा नक्की काय करायचे याची दिशाही नव्हती.

अमेरिकन परराष्ट्रमंत्री जॉन केरीने सीरियाने पुढच्या आठवड्यात रासायनिक शस्त्रे युनोच्या हवाली करावीत तर हल्ला टळेल असे विधान केले. हे विधान शब्दश: घेण्यासाठी नाही असा खुलासाही परराष्ट्रखात्याने लगेच केला. 'सीरिया असे करणे अशक्य आहे' हा या rhetoric चा अर्थ होता. मात्र रशियाने हे विधान शब्दश: उचलून धरले आणि सीरियाला रासायनिक अस्त्रे युनोच्या हवाली करायला आम्ही तयार करतो असे जाहीर केले.

रशियाचे सर्वेसर्वा पुतीन महाशयांनी न्यूयॉर्क टाइम्समध्ये १३ सप्टेंबरला अमेरिकन जनतेला उद्देशून लेखही लिहिला. त्यातही अमेरिकेची युद्धखोरी कशी व्यर्थ आहे हे नोंदवले व अमेरिका हा काही एकमेवाद्वितीय देश नाही असेही खडसावले.

आव असा की, जणू काही रशियाचे हात स्वच्छ आहेत, त्यांच्या देशात दडपशाही नाहीच!

पण या राजकीय रस्सीखेचीत रशियाने एका दगडात बरेच पक्षी मारले. एकतर सीरियाबाबत निर्णय घेण्यात आजवर रशियाची (चीनबरोबर) भूमिका युनोच्या सुरक्षा समितीत व्हेटो वापरणे एवढीच होती, तर आता अचानक निर्णायक भूमिका मिळाली. दुसरे म्हणजे NATO च्या सभासदांत सीरिया प्रश्नावर असणारी फूट नक्की झाली. (जर्मनी जी-२०च्या सप्टेंबरच्या परिषदेत तटस्थ राहिला व सीरियातील हस्तक्षेपावर त्याने सही केली नाही.) लिबियातील पश्चिमेची सशस्त्र कारवाई युनोला व रशियाला डावलून करण्यात आली होती. ते शल्य रशियाला झोंबत होते, त्याचेही उट्टे या निमित्ताने निघाले. चौथे म्हणजे, आधीच संभ्रमात असणाऱ्या ओबामावर निर्णय घेण्याची सक्ती येऊ घातली होती, त्यातून पळवाट देण्याचे श्रेयही मिळाले. पाचवे म्हणजे असदची राजवट काही काळ तरी चालू राहिली व पर्यायाने रशियाचा सीरियातील आरमारी तळही सुरक्षित राहील.

एक गोष्ट लक्षात यावी की ओबामा-पुतीन-असद यांच्या गणितात सामान्य सीरियन माणूस येतच नाही. एक लाख लोक मेले याची त्यांना फिकीर नाही. काळजी आहे ती राजकीय कुरघोडीत कोण यशस्वी होतो याची. नेतृत्वाचा भंपकपणा असा आहे. भौगोलिक स्वामित्वाच्या गणिताखेरीज त्यांच्या दृष्टिपथात काहीही येत नाही. म्हणजे, १४ सप्टेंबरला झालेल्या अमेरिका-रशियाच्या बोलण्यानुसार सीरियाने अगदी रासायनिक अस्त्रे आंतरराष्ट्रीय देखरेखीसाठी उपलब्ध केली तरी पारंपरिक शस्त्रांनी चालू असणारे हत्याकांड थांबणार नाही. मूळ प्रश्न तो आहे. असद तसाच दमनशाही करणार, नाही तर त्याचे अस्तित्वच धोक्यात आहे.

दरम्यान राष्ट्रसंघाच्या पथकाचा अहवाल १६ सप्टेंबरला प्रसिद्ध

*(पान ३० वर)*

***जगभर*** *(पान ९ वरून)*
झाला. सरीन नावाचा विषारी वायू वापरला गेला होता हे सिद्ध झाले. तो असदने वापरला असा पश्चिमेचा दावा. रशियाचा दावा असा की ही अस्त्रे वापरली ती बंडखोरांनी. जेणेकरून बाहेरचा हस्तक्षेप असद राजवटीविरुद्ध होईल. म्हणजे अधिकाधिक अर्धसत्ये मांडून मूळ मानवी संहाराकडून जगाचे लक्ष दुसरीकडे वेधणे हा या राजकारणाचा उद्देश आहे.

आणखी एक मुद्दा या संदर्भात लक्षात घ्यायला हवा. रासायनिक अस्त्रे हवाली करणे म्हणजे एखादी पिशवी टेबलावर ठेवणे नव्हे. सीरियात ती नक्की किती आहेत, कोठे आहेत, काय प्रकारची आहेत याची नीट माहिती कोणालाच नाही. असद तर अगदी आधीच्या आठवड्यापर्यंत अशी अस्त्रे नाहीतच असे म्हणत होता. अशा प्रकरणात राजवट सहकार्य देत असेल तर शोध तरी सोपा जातो. इथे तीही शक्यता गृहीत धरता येत नाही. रासायनिक अस्त्रे दोन प्रकारची असतात. एक लोकांवर हल्ला करायला 'तयार' अस्त्रे. दुसरा प्रकार म्हणजे दोन रसायने हल्ल्याच्या वेळी मिसळण्यात येतात व लगेच हल्ला करण्यात येतो. हे दोन घटक वेगळीकडे ठेवले जातात. रशियाने हा प्रस्ताव पुढे आणल्यासरशी सीरियाने ही रसायने पश्चिमेला माहीत असलेल्या ठिकाणांहून नागरी वस्त्यांमध्ये हलवायला सुरूवात केलीच आहे. जेणेकरून ती नष्ट करताना निरपराध नागरिक बळी जातील.

दुसरा मुद्दा म्हणजे अशी अस्त्रे शोधणे व व्यवस्थित निष्प्रभ करणे. याला स्थिर देशात कमीत कमी २५ ते ३० वर्षे लागतात. सीरिया तर अस्थिर आहे आणि काही काळ अस्थिर राहणारही.

आताच हा कार्यक्रम पुढच्या वर्षीच्या मध्याला सुरू होईल असा अंदाज आहे. या शोधासाठी तज्ज्ञांची पथके तेथे जाणार, रासायनिक प्रयोगशाळा, अस्त्रे निकामी करण्याची यंत्रणा तेथे जाणार. याचा खर्च प्रचंड आहे आणि या पाहुण्यांच्या सुरक्षिततेचीही हमी नाही.

सप्टेंबरच्या मध्यापर्यंत सीरियन पेच असा आहे. वेळकाढूपणाचे तीन भामट्यांचे धोरण राबवण्यात येत आहे. नरसंहाराला खीळ नाही. त्यामुळे बंडखोरांचे प्रतिनिधी या निर्णयाबाबत नाराज आहेत.

एकूण चित्र पाहता लाखांनी बळी जाऊनही उर्वरित जग या मानवी वेदनेबाबत निष्क्रिय आहे. जगाचा पोलीस म्हणून अरेरावी भूमिका घेणारी अमेरिका नमलेली दिसते. पण एका सीरियन माणसाच्या म्हणण्याप्रमाणे - आम्हाला अमेरिकेचा हल्ला नको पण असदही नको. हा तिढा सुटण्यातला दिसत नाही. अमेरिका नाही पण तशा राष्ट्रोत्तर शक्तीची आवश्यकता ही दुर्दैवाची बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघ ती भूमिका निभावू शकत नाही.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*